**नियमित दिवाणी दावा क्र. ६८/२०२२**
**हरिश्चंद्र वि.ग्रामपंचायत भातसई.**
CNR No. MHRG090006632022

## निशाणी क्र.२७ वरील आदेश

वादीने प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २६ नियम ०९ अन्वये उपअधिक्षक, भूमी अभिलेख, रोहा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करून त्यांचेकडून वाद मिळकतीमधील प्रतिवादीचे अतिक्रमणाचे अनुशंगाने अहवाल मागविण्याची विनंती केली.

०२. प्रस्तूतचे अर्जाद्वारे वादीने प्रतिवादी ग्रामपंचायतने मोजणी न करता व कोणतेही सुचना पत्र न देता दावा मिळकतीमध्ये अतिक्रमीत बांधकाम सुरू केल्याबाबत कथन केले. सदर बांधकामाचे अनुशंगाने कोणतीही कागदपत्रे प्रतिवादीने दिली नाही नाहीत. प्रस्तूतचा दावा अतिक्रमण दूर करून मिळणेकरीता दाखल केला असून दावा मिळकतीची मोजणी तज्ञ मोजणीदार मार्फत झाल्यास त्यामुळे प्रतिवादीला कोणताही पूर्वग्रह होणार नसल्याबाबत कथन केले.

०३. प्रतिवादीने त्याचे म्हणणे (नि.क्र.३२) दाखल केले. प्रतिवादीचे कथनाप्रमाणे वादीने प्रस्तूतचा अर्ज, तात्पुरता मनाई हुकूम अर्ज (नि.क्र.०५) वर सुनावणी होण्यापूर्वीच दाखल केला. प्रस्तूतचा अर्ज हा दाव्याची सुनावणी सुरू झाल्यानंतर दाखल करणे क्रमप्राप्त आहे. पक्षकारांनी पुराव्याद्वारे त्यांचे कथन न्यायालयासमक्ष मांडल्यानंतर न्यायालयाने न्यायालयीन आयुक्त नियुक्ती संबंधी आदेश

पारीत करणे गरजेचे आहे. वादी प्रस्तूतचे अर्जाद्वारे पुरावा गोळा करीत असून त्याने अतिक्रमणाचे अनुशंगाने केलेले कथन मोघम आहे. त्याचे कथनाचे पुष्ट्यर्थ वादीने पुरावा दाखल केला नाही. सबब प्रतिवादीने प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

०४. प्रस्तूतचा अर्ज व त्यावरील प्रतिवादीने दिलेले म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीचे वि.विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. वादीने प्रस्तूतचा दावा वाद मिळकतीमधील प्रतिवादीने केलेले अतिक्रमण दूर करून सदर क्षेत्राचा ताबा मिळण्याकरीता व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केल्याचे वादपत्रावरून दिसून पडते. त्याचप्रमाणे त्यावरून वाद मिळकत ही वादीची व त्याचे कुटूंबियांची वडिलोपार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत असल्याचे अधोरेखीत होते.

०६. महत्वाची बाब म्हणजे वाद मिळकतीमधील अतिक्रमणाचे अनुशंगाने न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती मागण्याकरीता वाद मिळकत ही वादीची मालकी हक्काची मिळकत असणे आवश्यक आहे. वादीने अभिलेखावर वाद मिळकती संबंधी दाखल केलेल्या सातबारा उताऱ्याचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता त्यामध्ये एकूण दहा व्यक्ती भोगवटदार असल्याचे दिसून येते. वादीचे कथन तो इतर कुटूंबियांचे वतीने वाद मिळकतीची देखभाल करीत असल्याचे अधोरेखीत करते. परंतू,सदरील सातबारा उताऱ्यामधील भोगवटदारांची आडनावे बघितली असता ती वादीचे आडनावांपासून भिन्न असल्याचे दिसून येते. सदरील भिन्न आडनावांचे व्यक्ती वादीचे कुटूंबातील सदस्य कशाप्रकारे आहेत?, याचा खुलासा वादीने केल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे वादीचे कुटूंबिय व सदरील भिन्न आडनावाचे व्यक्तींनी प्रस्तूतचा दावा चालविण्याचा अधिकार वादीला दिला, असे वादीचे कथन नाही. त्या अनुशंगाने वादीने कोणतेही अधिकारपत्र अभिलेखावर दाखल

केले नाही. नमूद परिस्थितीमध्ये वाद मिळकत वादीची व त्याचे कुटूंबियांची वडिलोपार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत असल्याचे ग्राह्य धरता येणार नाही.

०७. वादीने तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला अर्ज (नि.क्र.०५) नामंजूर करतेवेळी नमूद बाब प्रस्तूत न्यायालयाने मुख्यत्वाने विचारात घेतल्याचे दिसून येते. परंतू, सदरील अर्ज नामंजूर केल्यानंतर देखील वाद मिळकतीचे वडिलोपार्जीत मालकी वहिवाटीचे अनुशंगाने वादीने इतर भोगवटदारांकडून कोणत्याही प्रकारचे अधिकारपत्र किंवा लेखी दस्त मिळविल्याचे दिसून येत नाही.

०८. एकंदरीत वर नमूद परिच्छेदामधील बाबींचा साकल्याने विचार केला असता वादीने प्रस्तूतचे अर्जाद्वारे न्यायालयीन आयुक्तांमार्फत वाद मिळकतीची मोजणी करण्या करीता केलेली मागणी मान्य करणे न्यायोचीत ठरणार नाही. परिणामी, प्रस्तूतचा अर्ज (नि.क्र.२७) नामंजूर करण्यात येतो. खर्चाविषयी दाव्याचे निकालावेळी आदेश करण्यात येईल.

स्वाक्षरी/–

स्थळ : रोहा. (एस.एस.महाले)

दि.०६.०२.२०२४ दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर)

रोहा, जि. रायगड–अलिबाग.